**पि.डब्लु. डी.व्ही.ए क्र.०७/२०१८**
**आश्वीनी विरूद्ध रविकिरण**
**निशाणी क्र.६८ लगत**

**<u>अर्जदारांचे विधीज्ञ श्री.एस.यु. जगदंबे यांच्यामार्फत साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरु.</u>**

अर्जदार आश्वीनी माझी पत्नी आहे. अर्जदार क्र.२ अपूर्वा ही माझी मुलगी आहे. माझा विवाह अर्जदारासोबत ११/०२/२००८ रोजी धर्माबाद येथे झाला. हे म्हणणे खरे आहे की, माझा विवाह धर्माबाद येथे लाल बहादूर शास्त्री स्टेडिअम येथे झाला तेथे ५ ते १० हजार लोक जमण्याची व्यवस्था केली होती. हे म्हणणे आहे की, आम्ही सर्व गैरअर्जदार हे चांगल्या खाणदाणीतील व मोठ्या घरचे लोक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार क्र.३ ही माझी बहीण आहे व ती पूर्वी आमदार होती. ती जूक्कल मतदार संघातून २००० साली निवडून आली होती. हे म्हणणे खरे आहे की, आश्वीनी व तिचे वडिल धर्माबाद येथिल चांगले लोक आहेत म्हणून मी आश्वीनीशी लग्न केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या लग्नाचा संपूर्ण खर्च अर्जदाराच्या वडिलांनी केला आहे. अर्जदारासोबतच्या लग्न संबंधातुन मला एक मुलगी झालेली आहे. तिचे नाव अपूर्वा आहे व ती अर्जदारासोबत राहते. हे म्हणणे खरे आहे की, लग्नामध्ये अर्जदाराच्या वडिलांनी संसारउपयोगी साहीत्य कॉट, पलंग, टिव्ही, फ्रीज, ऐ.सी., दुचाकी मोटारसायकल इत्यादी दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराच्या वडिलांनी सोन्याची आंगठी व दहा तोळे सोने मला दिले आहे. अर्जदाराच्या वडिलांनी लग्नामध्ये नेमका किती खर्च केला हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या लग्नात अर्जदाराच्या वडिलांनी २५ लाख रूपये खर्च केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, लग्न झाल्यानतंर अर्जदार ही निजामाबाद येथे माझ्याकडे नांदायला आली त्यावेळी सर्व गैरअर्जदार निजामाबाद येथे आमच्या घरी राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराच्या वडिलांनी लग्नामध्ये अर्जदाराला दोन तोळयाचे नेकलेस, कानातले सोन्याचे रिंग व सोन्याचे पेंडॉल दिले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, लग्न झाल्यावर मी अर्जदाराला सुरूवातीचे दोन वर्ष चांगले सांभाळले. हे म्हणणे खरे नाही की, लग्नाला दोन वर्ष झाल्यानंतर मला असे वाटू लागले की आपण मोठे लोक आहोत बहीण माझी आमदार आहे त्यामुळे कॉंट्रॅक्ट व गुत्तेदारीचा व्यवसाय केला पाहिजे. हे म्हणणे खरे नाही की, गुत्तेदारीचा व्यवसाय करण्यासाठी मी अर्जदाराला तिच्या वडिलांकडून ५ लाख रूपये घेवून ये अशी तिच्याकडे मागणी केली. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदाराला जास्त त्रास दिल्यामुळे अर्जदाराच्या वडिलांनी मला एक लाख रूपये आणून दिले. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदाराला तिच्या माहेरून पैसे आण म्हणून तिच्याकडे पैस्याची मागणी करायचो व तिने पैसे आणले नाही म्हणून मी तिला अत्यंत घानेरडया शब्दात शिवीगाळ करायचो, मारहाण करायचो.हे म्हणणे खरे नाही की,

गैरअर्जदार क्र.२ ते ७ हे मला अर्जदाराबद्दल खोटेनाटे सांगायचे व अर्जदाराला मारहाण करायला लावायचे व त्यांचे सांगण्यावरून मी अर्जदाराला शिवीगाळ करायचो, मारहाण करायचो.

राजलक्ष्मी पि. राजय्या ही महिला माझी नातलग नाही. तिला मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, राजलक्ष्मी पि. राजय्या या महिलेसोबत माझे विवाहबाह्य संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, राजलक्ष्मी हिच्यासोबतच्या संबंधामधून मला ३१/१०/२०१६ रोजी एक मुलगी झाली आहे व तिचे नाव वैश्नवी आहे. हे म्हणणे खरे नाही की, राजलक्ष्मी हीच्यासोबतच्या संबंधातून मुलगी झाली म्हणून अर्जदाराने माझ्याकडे विचारणा केली असता, मी व इतर गैरअर्जदारांनी अर्जदाराला बेदम मारहान केली, शिवीगाळ केली तसेच तिचा डावा पाय फॅक्चर केला. आता मला प्रगती हॉस्पीटल निजामाबादने जारी केलेल्या एका प्रमाणपत्राची सत्यप्रत दाखविली त्यातील मजकुर खरा नाही. अर्जदाराच्या वकीलांनी त्यास नि.क्र. देण्याची विनंती केली त्याला गैरअर्जदाराच्या वकीलांनी हरकत घेतली. (आदेश)– सदरचे प्रमाणपत्र हे सत्यप्रत आहे व त्यातील मजकुर हा मूळ प्रमाणपत्र जारी करणा–या व्यक्तीच्या साक्षीमधून शाबीत करणे आवश्यक आहे त्यामुळे त्यास नि.नंबर देता येत नाही. त्याप्रमाणपत्रास ओळखीपूरते आर्टीकल अ देण्यात आले. आता मला एक फोटो दाखविण्यात आला त्यामध्ये दाखवण्यात आलेल्या मुलीस मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या फोटो मधील मुलगी ही राजलक्ष्मी पासून मला झालेली मुलगी आहे. हे म्हणणे खरे नाही की, वैश्नवीचा फोटो मी माझ्या वाट्स ॲप स्टेटसला ठेवलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, राजलक्ष्मीसोबत माझे संबंध प्रस्तापित झालेनंतर गुत्तेदारीच्या कामाला जात आहे म्हणून मी दोन–दोन महिणे घरी येत नसे. हे म्हणणे खरे नाही की, मी दोन–दोन महीणे गैरअर्जदार नं.८ राजलक्ष्मी हीच्यासोबत राहत असायचो. हे म्हणणे खरे नाही की, दोन–तिन महिण्यानंतर मी घरी दारूच्या नशेत यायचो व पाच लाख रूपये आणले नाहीत म्हणून अर्जदाराला मारहाण करायचो, शिवीगाळ करायचो. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराने पाच लाख रूपये आणले नाहीत म्हणून मी तिला प्रचंड त्रास द्यायचो, तिला उपाशी ठेवायचो. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २२/०३/२०१६ रोजी अर्जदाराला मी व इतर गैरअर्जदारांनी मारहाण केली, शिवीगाळ केली व अर्जदार क्र.२ सोबत घराच्या बाहेर काढले. माझी मुलगी अपूर्वा हिचे वय अंदाजे १७ वर्ष आहे. अपूर्वा ही नांदेडमध्ये शिक्षण घेत आहे. अपूर्वा कोणत्या कॉलेज मध्ये शिक्षण घेत आहे व ती कोणत्या शाखेमध्ये शिक्षण घेत आहे हे मला माहीत नाही. अपूर्वा नांदेड मध्ये शिक्षण घेत आहे त्या कॉलेजची, टुशनची किंवा हॉस्टेलची फी मी भरली नाही. हे खरे आहे की दिवसेंदिवस माहागाई वाढत आहे. नांदेडमध्ये एका व्यक्तीला दरमहा भोजणाचे ४००० रूपये खर्च येतो हे मला माहीत नाही. हे खरे आहे की, जाणेयेण्यासाठी ऑटोचे भाडे व स्टेशनरीसाठी वेगळा खर्च येतो. हे खरे आहे की, अपूर्वा ही एक हुशार विद्यार्थिनी आहे व ती चांगल्या शाखेमध्ये शिक्षण घेत आहे. या वर्षी अपूर्वा हीला खाजगी कोचिंग

क्लासेसचा २ लाख रूपये खर्च झाला आहे याबद्दल मला माहीत नाही साक्षीदार सांगतो असा खर्च होउ शकतो. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराचे वडिल व त्यांच्या नातेवाईकांनी अर्जदाराला नांदवून घ्यावे म्हणून मला अनेक वेळा समजावून सांगितले परंतु मी त्यास नकार दिला व अर्जदाराला नांदवले नाही. हे खरे आहे की, अर्जदाराला कोणतीही नोकरी नाही व तिला उत्पन्नाचे साधन नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी पत्नी आश्वीनी व मुलगी अपूर्वा अत्यंत गरीब परिस्थितीत जीवन जगत आहेत.

हे खरे नाही की, निजामाबाद येथे घर क्र. ६–२१–११५ हे घर आमचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे आणि माझ्या वडिलांच्या नावे निजामाबाद येथे ४ ते ५ बिल्डींग आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्या बिल्डींगमधून आम्हाला दरमहा २० ते २५ हजार रूपये भाडे मिळते. हे म्हणणे खरे नाही की, गुत्तेदारीच्या कामातुन व इतर कामातून मी दरमहा ५० ते ६० हजार मिळवतो. हे म्हणणे खरे नाही की, दरसाल आम्हाला ८ ते १० लाख रूपये उत्पन्न मिळते व मी अर्जदारांना प्रत्येकी दरमहा १० हजार रूपये पोटगी देवू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, निजामाबाद येथे माझ्या वडिलांच्या नावे साडेसात एकर प्लॉटींगची जमीन आहे व प्लॉटींगचे काम मी स्वत: करतो. हे म्हणणे खरे नाही की, त्या जमीनीची देखभाल मी स्वत: करत असतो. मी व माझे वडिल एकत्रित राहतो.हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार व तिच्या मुलीस पोटगी दायला लागू नये म्हणून मी प्लॉटींगची जमीन माझे वडिलांच्या नावे केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदाराला मारहाण करून तिला मुलीसह घरातुन बाहेर काढले व तिचे आयुष्य बरबाद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आश्वीनीसोबत झालेला विवाह अद्याप ही कायम आहे व तिच्या सोबत माझा घटस्फोट झालेला नाही.

**प्रश्न –** सन २०१६ ते २०२५ या कालावधीमध्ये तुम्ही अर्जदाराला पत्नी म्हणून प्रेम दिलेले नाही.
**उत्तर –**अर्जदार तिच्या मर्जीने निघून गेली आहे.

अपूर्वाचा जन्म १४/०६/२००९ साली झाला आहे. सन २००९ पासुन अपूर्वाच्या नावावर पोस्टात पैसे भरले नाहीत. अर्जदाराने माझ्याविरूद्ध २०१८ साली कारवाईचा अर्ज केला. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१७ साली संसार पूनरस्थापित व्हावा म्हणून आश्वीनी हीने नांदेड येथे अर्ज केला होता परंतु आमचा संसार पूनरस्थापित झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, २०१६ साली मी आश्वीनीला हाकलुन दिल्यानंतर तिने २०१७ साली माझ्या विरूद्ध पोलीस कारवाई चालू केली व त्यामधून वाचण्यासाठी आणि साहाणूभूति मिळविण्यासाठी मी आपूर्वाच्या नावावर दरमहा २००० रूपये पोस्टात जमा करणे चालू केले व तिची शाळेची फी भरू लागलो. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१६ साली मी आश्वीनी हीला मारहाण करून घरातुन बाहेर काढल्यानंतर आजपर्यंत मी

तिला नांदायला आणण्याचा एकदाही प्रयत्न केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदारांना प्रत्येकी दरमहा १० हजार रूपये उदरनिर्वाहाकरीता व घर भाडे म्हणून १० हजार असे एकुण ३० हजार रूपयाची आवश्यकता आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदाराला मारहाण करून कौटुंबिक हिंसाचार केला म्हणुन मी तिला २० लाख रूपये नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार व तिच्या मूलीस पोटगी दायला लागू नये म्हणून मी माझे पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले आहे व आज रोजी खोटी साक्ष दिली आहे.

**उलटतपास–पुर्ण**
**फेरतपास–नाही.**
दि. ०४/११/२०२५
वा.दा.ब.अ.क.केले.

श्रवणोत्तर स्वीकृती,

Sd/–

(एस.एम.कोळेकर)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धर्माबाद.

(एस.एम.कोळेकर)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धर्माबाद.